# व्यक्ती-वल्ली - जिवाला जीव देणारे मित्र, रमेश वावीकर…




प्रिय हितचिंतक,

मित्राची खरी व्याख्या अशी: "*शब्दांना भावरूप देते, तेच खरे पत्र. नात्यांना जोडून ठेवते, तेच खरे गोत्र. नजरेपल्याड पाहू शकतात, तेच खरे नेत्र. दूर असूनही दुरावत नाहीत , तेच खरे मित्र.*" इंग्रजीत त्याला म्हणतात, *"Good friends care for each other, Close friends understand each other, but True friends stay Forever, beyond Words, beyond Distance, beyond Time…"* आणि हे सर्व यथायोग्य व पूर्णपणे लागू पडतं ते माझे हितचिंतक-मित्र, एकमेव 'रमेश वावीकर' यांना. ही अतिशयोक्ती नसून मी हे अभिमानाने व नम्रपणे येथे व्यक्त करतो. ते पुढील लेखावरून तुम्हालाही निश्चित पटेल अशी खात्री बाळगतो.

मंडळी, हल्ली e-bay वर नानाविध चित्रांचा लिलाव होतांना दिसतो. त्यात भारतीय चित्रपटातील कलाकारांचे असंख्य फोटोही दिसतात. ते पाहून माझ्याकडील सिनेक्षेत्रातील दुर्मिळ छायाचित्रें माझ्या डोळ्यांसमोर येतात. कांही कलाकारांच्या स्वाक्षरीसह आहेत. त्यात मंगेशकर भावंडांचा स्वाक्षरीसह एकत्र फोटो असून फक्त उषाताईंची स्वाक्षरी त्यात नाहीये. जी मंडळी उषाताईंची स्वाक्षरी मिळवण्यासाठी मला मदत करीत आहेत त्यातील एकाने मला तातडीने कळविले की, "*जयंतराव, तुम्हाला आनंदाची बातमी आहे. उषाताईंची स्वाक्षरी लवकरच मिळेल. तेव्हा, मुंबईहून तुमच्या*

*माहितीचे कुणी अमेरिकेला इतक्यात जाणार असेल तर, त्याला मला त्वरित संपर्क करायला सांगा..."* अर्थात, हे ऐकून मला अत्यानंद झाला होता. योगायोगाने मुंबईत असलेले रमेश वावीकर एका आठवड्यातच अमेरिकेला परतणार होते. त्यांनी ती जबाबदारी आनंदाने स्वीकारली आणि मी निश्चिन्त राहिलो. दरम्यान रमेश येथे परतले. परंतु, त्या फोटोविना..! दुर्दैवाने ह्याही वेळेला ती मिळाली नाही आणि या मुद्यावरूनच मला हे रमेश वावीकर कोण म्हणून प्रांजळपणे एक लेख लिहावासा वाटला. तो अशासाठी की असे हे विश्वासू, विनयशील, प्रेमळ, सज्जन, परोपकारी, निर्मळ मनाचे, व्यवसायात उच्च पदावर (जनरल मॅनेजर-रिझर्व्ह बँक) असणारे, सर्व कलांची आवड असणारे, समाजसेवा करणारे, दानशूर वृत्तीचे, परोपकारी, अत्यंत साध्या विचारसरणीचे इत्यादी, इत्यादी हे रमेश माझे स्नेही-मित्र-हितचिंतक बनले आहेत. कारण, वावीकारांना त्या उषाताई मंगेशकरांच्या Priceless अशा स्वाक्षरी फोटोचं खऱ्या अर्थानं महत्व पटलं होतं..! वर सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ‘मित्राची खरी व्याख्या काय’ ते यावरून समजेल. असो. रमेश वावीकर याही पुढे गेले होते तेही आता ऐका…

मुंबईला जाण्याआधी रमेशने कळविले होते की,*"जयंत, मी तुमच्या 'गुलदस्ता' पुस्तकांच्या १० कॉपीज तुमच्यासाठी घेऊन येतो. तसेच, दुसरं कांहीही काम असेल तर मला जरूर सांगा. कृपया संकोच नसावा. मी ते आनंदाने करेन..."* मी त्यांना सांगितलं, *"धन्यवाद रमेश. आपण नम्रपणे विचारलंत यातच सर्व कांही आलं."* मी त्यांना त्या प्रकाशकाचा फोन नंबर दिला. पैसे देऊन माझ्या पुस्तकाच्या फक्त दोन कॉपीज रमेश यांना मिळाल्या. अधिक कॉपीज न मिळाल्यामुळे थोर मनोवृत्तीच्या रमेश यांना अतिशय दुःख झालं होतं. केवळ माझ्यासाठी त्यांनी प्रेमापोटी घेतलेली ती धडपड, तळमळ, खटाटोप व प्रयत्न हे विशेष व बहुमोल होते. त्यातली एक कॉपी कॉम्प्लिमेंटरी म्हणून मी रमेश यांना स्वतःसाठी ठेवा म्हणून सांगितले. हा भाग वेगळा. पाठविलेल्या पुस्तकाबरोबर मला रमेशसह त्यांचा व माझा मित्र, जयंत त्रिंबककर यांचं माझ्या पुस्तकाबद्दल अतिशय कौतुकाने लिहिलेलं पत्र होतं. ते वाचून मी भारावून गेलो. तुम्हालाही ते मोहवून टाकेल.

माझं 'गुलदस्ता' हे पुस्तक वाचून रमेश म्हणतात, *"जयंत, तुमचे “गुलदस्ता“ हे पुस्तक नुसतेच वाचनीय नाही, तर "UNPUTDOWNABLE आहे. त्यातील सर्व लेख खूप महत्वाचे, authoritative, व रसाळ भाषेत लिहिलेले आहेत. फोटो दुर्मिळ व संग्राह्य आहेत, ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा आहेत. माझे कॉलेजच्या दिवसांपासूनचे ६० वर्षांहून अधिक काळचे मित्र जयंत त्रिंबककर, अरुण पंडित व इंद्रजित सावंत हे तर या विषयाचे गड्डे / गाढे चालते बोलते कोशकार..! त्यांना तर ते मोहवून टाकेल. १. या पुस्तकाच्या प्रती सर्व मराठी वाचनालयांत ठेवल्या पाहिजेत. २. FTII व इतर संबंधित संस्थांमध्ये ठेवल्या पाहिजेत. ३. या पुस्तकाचा विस्तृत, उत्कृष्ट, सविस्तर, परिचयात्मक व आस्वादक लेख सर्व महत्त्वाच्या वर्तमानपत्रांतून प्रसिध्द लवकरांत लवकर झाला पाहिजे. हे काम तुमच्या माहितीतील कोणी*

*अधिकारी व्यक्तीने त्वरित करावे. माझा मित्र जयंत त्रिंबककर फिल्म इंडस्ट्रीतील व्यक्तींवर लिहित असतो. त्याने असा लेख लिहिण्याची जबाबदारी घेतली तर आपल्याला फॉलोअप करायला सोपे जाईल. जयंत त्रिंबककर शिवाजी पार्कच्या आसपास राहायला होता. त्याची मटा संवाद पुरवणीच्या संपादकांशी व इतर वृत्तपत्रांत चांगली ओळख आहे. "दिशा" साप्ताहिक "झी २४ तास" वाहिनीचे संपादक श्री. विजय कुवळेकर हे आम्ही नुकत्याच केलेल्या "बिंब प्रतिबिंब" पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाचे अध्यक्ष होते. साप्ताहिक दिशा अत्यंत दर्जेदार असल्यामुळे लोकप्रिय आहे. तुमच्याही प्रचंड ओळखी आहेत. मृदुलाताईंच्याही असणार. महत्वाचा मुद्दा असा आहे की इतके सुंदर, वाचनीय, संग्राह्य व ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे पुस्तक दुर्लक्षित होऊन लोपले जातां कामा नयेच नये. त्याला योग्य तो न्याय मिळालाच पाहिजे. तो न मिळाला तर त्या पापाचे धनी आपण होऊं. या कामासाठी मी यथा शक्ती, यथा मती, मदत करू इच्छितो. माझी ही कळकळीची सूचना आपण दुर्लक्षूं नये ही नम्र विनंती. यात सर्व कांही आहे..."*




***१) रमेश वावीकर, मुद्दल गास्करा जोशी व जयंत त्रिंबककर... २) संवादिनी वादक पं. तुळशीदास बोरकर यांचा खाजगी कार्यक्रम ऐकतांना... ३) पं. तुळशीदास बोरकर यांच्यासमवेत रमेश वावीकर...***

जयंत त्रिंबककर यांनी रमेश यांचा शाळेपासून पुस्तक खरेदीचा व्यासंग किती अफाट आहे यावर एक त्रोटक लेख महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रकाशित केला होता. तोही रमेश यांच्या मुंबईतील अगदी थोड्या दिवसांत आलेल्या अनुभवावरून लिहिला होता. थोडक्यात,'*गवसली सोन्याची खाण*' असा त्याचा विषय होता. काय झालं, नेहमी प्रमाणे संध्याकाळी पार्ल्याला फिरत असतांना सेकंड हँड व रद्दी पुस्तके विकण्याच्या दुकानांत रमेश शिरले व पुस्तके चाळूं लागले. इतक्यात त्यांची नजर "बिंब प्रतिबिंब" या फारशा चांगल्या स्थितीत नसलेल्या पण आकर्षक नांव असलेल्या पुस्तकाने वेधून घेतली. इतरही दोन-तीन जुनी पण दुर्मिळ  व वाचनीय पुस्तके त्यांनी विकत घेतली. "बिंब प्रतिबिंब" या पुस्तकांत एका बाजूला सुप्रसिध्द इंग्लिश कवींच्या कविता होत्या व त्यांच्या समोरच्या पानांवर त्यांचा सुगम, सुंदर काव्यांत मराठी भावानुवाद होता. 'गोल्डन ट्रेझरी' मिळाल्याच्या आनंदात घरी नेऊन वाचण्यांत इतके ते त्यात रमले होते की, पहाट कधी झाली ते त्यांना कळलेच नाही. इतके ते त्यात रमले होते..! त्यानंतर,

मोठ्या प्रयासाने त्यांनी लेखिका पुण्याच्या डॉ. हेमाताई क्षीरसागर यांचा फोन नंबर शोधून काढला व त्यांना फोन करून पुस्तकाच्या कांही प्रती विकत मिळतील का अशी चौकशी केली. हेमाताई या एम्. ए, एम्. एड्., पीएच. डी., टिळक महाविद्यालयाच्या निवृत्त प्राचार्या, संस्कृत पंडिता, लेखिका व विदुषी आहेत. त्यांच्याकडेही एकच प्रत होती. ती त्यांनी रमेशला पाठवली. रमेशने त्यांच्या अनुमतीने काही मोजक्याच Xerox प्रती काढून आपल्या साहित्य प्रेमी रसिक मित्रांना, ज्यांना त्या इंग्लिश कविता ६० वर्षांनंतरही तोंडपाठ होत्या, त्यांना पाठवल्या. त्यानंतर रमेशने हेमाताईंना गळ घातली की इतके सुंदर पुस्तक इंग्लिश लिटरेचर व मराठी काव्याच्या अभ्यासकांना उपलब्ध होणे आवश्यक व महत्वाचे आहे. त्याकरतां नवीन आवृत्ती काढून त्याचा प्रकाशन समारंभ मुंबईंत मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली व उपस्थितीत करण्यांत यावा. त्यासाठी सर्व ती मदत रमेश, त्यांचे मित्र जयंत त्रिंबककर, इंद्रजित सावंत व मृदुलाताई जोशी यांच्या सहाय्याने करायला तयार आहेत. त्याप्रमाणे, नुकताच तृतीय आवृत्तीच्या प्रकाशनाचा समारंभ १९ जानेवारी २०१९ रोजी दादरला सावंतवाडी संस्थान मराठा समाजाच्या हॉलमध्ये, झी २४ तास वाहिनीचे व साप्ताहिक दिशा या लोकप्रिय अंकाचे संपादक श्री विजय कुवळेकर यांच्या अध्यक्षतेखाली व पॉप्युलर प्रकाशन या  संस्थेचे संचालक डॉ. रामदास भटकळ यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला होता…

***'बिंब-प्रतिबिंब' या डॉ. हेमा क्षीरसागर यांच्या कविता संग्रहाच्या तिसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाची कल्पक आमंत्रण पत्रिका…***




मनमिळाऊ रमेश यांचा मित्र परिवार जितका अफाट आहे तितकाच  विविध कलांतील नामवंत व्यक्तींशीही त्यांचा परिचय आहे. कारण, सर्वांना उचलून मदत करण्याची त्यांची निरपेक्ष वृत्ती

होय. सुप्रसिद्ध संवादिनी वादक पंडित तुळशीदास बोरकर यांच्यावर उत्कृष्ट डॉक्युमेंटरी फिल्म प्रकाशित झाली होती. ती मला रमेश यांनी पाठवून दिली होती. आणि ती पाहून मी इतका मोहित झालो की, जे श्रम त्यामागे घेतले होते ते अप्रतिम-अजोड होते. आणि त्या फिल्ममध्ये कुठेही कृत्रिमपणा नव्हता. पंडित बोरकरांना बोलण्यासाठी सर्व वेळ दिला होता. फिलाडेल्फियाचे प्रख्यात गायक डॉ. विवेक खाडिलकर व त्यांच्या पत्नी डॉ. मंगला यांनी या डॉक्युमेंटरीची फिल्मची निर्मिती केली होती. दिग्दर्शक होते श्री. अशोक राणे. हे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलचे नामवंत ज्युरी, कांही डॉक्युमेंटरीजचे दिग्दर्शक व लेखक होते. पं. बोरकर यांच्यावरील डॉक्युमेंटरी फिल्मच्या निर्मितीत सुप्रसिद्ध आर्किटेक्ट व लेखक श्री. नरेश शहा यांचेबरोबर रमेशचा सहभाग होता. पंडितजींनीही उत्तमपणे त्यांच्या जीवनावर संवादिनीप्रमाणेच जणू बोटं फिरवून कथित केलं होतं. येथे पूर्णपणे दिग्दशर्क नजरेत भरतो. त्या 'संवादिनी साधक पंडित तुळशीदास बोरकर' डॉक्युमेंटरी फिल्मची झलक येथे पाहावी: https://www.youtube.com/watch?v=UGC5sP4TnNk&t=8s

तसेच, कै. सुधीर फडके ऊर्फ बाबूजी यांच्या ध्येयवादी "वीर सावरकर" या सिनेमाच्या निर्मितीत रमेश यांचा सहभाग फार मौलिक होता. रमेश हे बाबूजींच्या "सावरकर दर्शन प्रतिष्ठान" चे सचिव व विश्वस्त या नात्याने बाबूजींचे सहकारी होते. त्याचप्रमाणे, बाबूजींना 'गीत रामायण' व अमेरिकेतील इतर कार्यक्रमांद्वारा-देणग्यांद्वारां या फिल्मसाठी अमेरिकेतील भारतीय लोकांनी मुक्तहस्ताने देणग्या दिल्या होत्या. हा मोठा निधी भारतात आणण्यासाठी रमेशने सर्वोतोपरी निस्वार्थीपणे केलेली अजोड व अतुलनीय मदत कुणीही विसरणं शक्य नाही.

मुंबईहून आमच्या कौटुंबिक स्नेही सुप्रसिद्ध लेखिका, संपादिका, अभ्यासक व संस्कृत भाषेतील पंडिता मृदुला आगास्कर/जोशी हिचा मला निरोप आला की, *"जयंता, तुझ्या हितचिंतकांच्या मेलिंग लिस्ट मध्ये 'रमेश वावीकर' यांचा समावेश कर. तू ज्या विषयात लिहितोस ते त्यांनाही वाचायला आवडेल..."* याला वर्ष होऊन गेलं होतं. मी अधून मधून रमेश यांना माझ्या लेखांच्या मेल्स पाठवायला विसरत होतो. ती माझी चूक होती. परंतु, ते मला त्याची दखल करून देत असत. हा रमेश यांचा चांगुलपणा होता. पुढे हे माझं भाग्यही ठरलं. रमेश कॉलेजमध्ये एक अतिशय हुशार विद्यार्थी होता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामधील नोकरीत 'जुनियर क्लार्क' पासून ते 'जनरल मॅनेजर' या उच्च पदापर्यंत स्वतःच्या कर्तृत्वाने त्यांनी मजल मारली होती. रमेशचा वाचनाचा व्यासंग फार दांडगा आहे. तसेच, संगीताची त्यांना खूप आवड असून त्यातील जाण आहे. गरीब विद्यार्थ्यांना व माणसांना तो नेहमीच मदत करीत असतो. निवडक संगीत व सांस्कृतिक संस्थांना तो यथाशक्ती साहाय्य करतो. हे सर्व तो प्रसिद्धी पराङमुख होऊन करतो. रमेश मोठ्या मनाचा, सज्जन व सहृदय व्यक्ती आहे. कारण, मृदुलाप्रमाणेच रमेश आमच्या वडिलांचे (Prof. V. H. Kulkarni) १९५७ ते १९६१ पर्यंत रुईया कॉलेज

मधील अत्यंत बुद्धिमान व निष्ठावंत विद्यार्थी होते. माझे वडील हे इंग्रजीचे प्राध्यापक होते. आणि, रमेश हे (इंग्रजी उत्तम म्हणून) वडिलांचे आवडते विद्यार्थी होते. त्यामुळे रमेश हे आमच्या घरी गुरुदर्शनासाठी कांही वेळां येत असत. आणि मंडळी, मी केवळ रमेश यांच्या आदरणीय व आवडत्या शिक्षकांचा मुलगा व आवडीचा लेखक म्हणून रमेश यांना माझ्याशी संपर्क नव्हे, संबंध-स्नेह-मैत्री जुळवायची होती. ही आमच्या वडिलांची कृपा होती. आज त्या मैत्रीचा पीळ अधिक घट्ट झाला आहे असं मला जाणवलं. त्यामुळे भाग्य माझं उजळलं. आणि मृदुलाने मला रमेशची थोडक्यात परंतु, ठळक माहिती दिली त्यात शेवटी म्हटलं होतं रमेश म्हणजे, *"असामान्य, विलक्षण व जिवाला जीव देणारा मित्र आहे"* हे त्रिवार सत्य आहे हेही पटेल. त्यामुळे मी मृदुलाचा शतशः आभारी आहे..!

आपला,
जयंत विठ्ठल कुळकर्णी

Jvkny1@gamil.com

---